# रहस्यमय जंगल

(जादूची कथा)

अनघा हिरे



साहित्य प्रतिष्ठान

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

**प्रकाशन** :- ४ जून २०१७

# रहस्यमय जंगल

सौ. अनघा हिरे

संपर्क --- anagha.hiray@gmail.com

९४२२२८४११६

# रहस्यमय जंगल

राजा विक्रमादित्य आणि राणी कल्याणी आपल्या नगरात राज्यकारभार



करत होते . त्यांचा प्रशस्त राजवाडा होता. राजवाडयाबाहेर भलामोठा बगिचा अन त्या बगिच्यात खुप खुप फुलांची झाडे होती. मधोमध एक कमळाच तळं, जवळच एक संगितावर नाचणारा कारंजा होता. कारंजापासूनच लांबलांब संगमरवरी दगडाच्या पायऱ्या होत्या. त्या पायऱ्या चढून आल्यावर राजवाडयात प्रवेश होत असे. राजवाडयाच्या प्रवेशव्दारावर मोठी कमान होती. राजवाडयात प्रवेश केल्यावर आजुबाजुला हिरे माणकांनी सजलेल्या सोन्याच्या भिंती होत्या राजवाडयात प्रशस्त दालन मोठमोठया झुंबरांनी सजला होता. दालनामध्ये सुध्दा मधोमध एक कारंजा होता. राजवाडयात प्रशस्त मोठाल्या अगणित खोल्या होत्या.

हया नगराचा राजा म्हणून विक्रमादित्यला खुप मान होता. त्याची राणी कल्याणी हिला सुध्दा सर्व नगरी आईसारखीच समजत होती. राजाचे आपल्या प्रजेच्या दु:खाकडे सतत लक्ष असे. नगरातील प्रजा आपल्या राजावर खुप प्रेम करत असे.

राणी देखील आपल्या नगरात दान धर्म करण्यात प्रसिध्द होती. तिच्याकडे कधी कोणी काही मागितलं आणि तिने त्याला नाही म्हंटलं असे कधी झालंच नाही.

राजाला तिन मुलं अन एक मुलगी होती. पहिला राजपुत्र विक्रमसेन, दुसरा राजपुत्र गौरवसेन, तिसरा राजपुत्र आदित्यसेन व हया तिन्ही राजपुत्रांची एकुलती एक लाडकी बहिण ती म्हणजे राजकन्या आदिती.

राजा राणिला आपल्या मुलांचा खुप अभिमान होता. कारण ते खुप अज्ञाधारक व शुर होते. त्यांच्यापुढे एकही शत्रू टिकत नव्हता. भले भले योध्दे आदित्यसेन, गौरवसेन व विक्रमसेनच्या समोर यायला घाबरत होते. राजकन्या सुध्दा खुप सुंदर होती. तिचे लांब सडक सोनेरी केस म्हणजे जणू रेशिमच. तिचे खेळणे, इकडून तिकडे फिरणे अगदी अल्हाददायक होत. तिच्या अस्तित्वामुळे आजुबाजुचा सर्व परिसर खुलून जात होता. पक्षी सुध्दा आनंदाने टक लावून तिच्याकडे बघत. तिच्या जवळ असण्याने ते गाणं म्हणणं विसरुन जात. बागेतले फुलं अधिक टवटवीत बनत, तिच्या स्पर्शाने फुलपाखरु सुध्दा अधिक चमकदार बनत.



राजा राणी आपल्या लाडक्या सुंदर कन्येकडे कौतुकाने बघत. राजा नेहमी राणीचे आभार मानायचा की तुझ्यामुळे आपली कन्या खुप सुंदर झाली आहे. राणी सुध्दा राजाच्या शौर्यामुळे मुलांच्या गुणांचे कौतुक करी.

तिन राजकुमार अतिशय अज्ञाधारक आईवडिलांना ते नेहमी मान देत. तसेच आपल्या एकुलत्या एक बहिणीचे पण खुप लाड करत. रोज आपल्या बहिणीशी गप्पा मारल्याशिवाय त्यांना बरं वाटत नसे. राजपुत्र आदित्यसेन व राजकन्या आदिती हे जुळे भावंड असल्यामुळे आदित्यसेनचे तर तिच्यावर खुप प्रेम होते.

सर्व हसत खेळत चाललेल असतांना एक दिवस त्यांच्या आनंदाला कोणाचीतरी दृष्ट लागली.

एकदा राजकन्या बागेमध्ये बागडत असतांना अचानक तिला एक विचित्र असा गिळगिळीत किडा पायाला चावला. कोणाला काही समजायच्या आत राजकन्या बेशुध्द होऊन खाली पडली. सगळेजण धावत तिच्याजवळ आले. सर्वांनी तिला अलगद उचललं. तिच्या दालनात आणलं. पटकन राजवैद्यांना बोलावण्यात आल. एक नाही दोन नाही चांगले पाच पाच हकिम तिथे आले. राजकन्येवर उपचार चालू केले. पण राजकन्येला कशानेच बरे वाटेना तितक्यात तिथे जादुगरणी चित्रांगणा आली.



तिच्या सांगण्यानुसार तीची मोठी बहिण एक जादूगर आहे. तिनेच मुद्दाम राजकन्या बेशुध्द व्हावी या हेतूने राज्याच्या बागेत किडा सोडला होता.

आता ही जादुगरणी चित्रांगणा राजाला मदत करायला आली. येत्या पौर्णिमेच्या चौथ्या दिवसापर्यंत राजकन्येच्या तोंडात मधाचा थेंब सोडल्याने ती शुध्दीवर येईल. पण पौर्णिमेच्या चौथ्या दिवसापर्यंत मध मिळाले नाही तर राजकन्या कायमचीच आपल्याला सोडून जाईन.

"मध ! अं ते तर काय सोप्प आहे" राजाने सेवकांना मध आणण्यास सांगितले पण तितक्यात चित्रांगणाने त्यांना हटकले "राजा कोणत ही मध राजकन्येला उपयोगी नाही" तुमच्या नगरा पासून पाच जंगल पार केल्या नंतर मोठे पाच डोंगर ओलांडून पुढे गेल्यावर लाल रंगाचा समुद्र आहे. त्या समुद्रातच एक सोन्याच कमळ आहे. त्या कमळाच्या देठात एक मधु कलश आहे. त्या कलशातले मधच राजकन्येचा प्राण वाचवू शकेल.

जादूगरणीने त्यांना सांगितले तिथे जाणं सोप्प नाही, हे पाचही जंगल, हे डोंगर पार करतांना तुम्हाला खुप संकटांना तोंड द्यावे लागेल.

राजकुमार लगेचच जाण्यास तयार झाले. आपल्या लाडक्या बहिणीचा जीव वाचविण्यासाठी कोणत्याही धोक्यांना सामोरे जाण्यास ते तयार होते. राणी खुप चिंतेत होती. तिने आपल्या मुलांना जवळ घेऊन एकेक संरक्षक ताईत बांधला राजाला आपल्या मुलांच्या शौर्यावर खूप विश्वास होता.



जादुगरणी चित्रांगणाने राजकुमारांना समुद्राच्या पाण्यात जाण्यासाठी काही गोळया दिल्या हया गोळयांपैकी एकेक गोळी खाल्यावर ते पाण्यात माश्याप्रमाणे राहू शकतील

तसेच जादुचे काही हत्यार व औषधाची बाटली दिली. त्याचा एक थेंब कोणतीही मोठयात मोठी जखम क्षणात बरी करु शकेन. राजा राणीचा आशिर्वाद घेऊन राजकुमार आपले घोडे, लढाईचे समान व खाण्याचे सामान घेऊन पुढे निघाले. नगर सोडून खुप दुरवर पोहचल्यावर त्यांना पहिलं जंगल लागलं पहिल्या जंगलात प्रवेश केला तर ते जंगल त्यांना जरा विचित्रच वाटलं. मोठा राजकुमार विक्रमसेनने आपल्या दोन्ही भावांना जवळ घेतलं आणि त्यांना त्यांने सांगितल की आता आपण सावध राहिलं पाहीजे. प्रत्येक पाऊल सावधगिरीने टाकलं पाहिजे. आपली एक चुक आपल्या बहिणीच्या जीवाला धोका पोहचवू शकते. आता मी पुढे राहीन माझ्या मागूनच तुम्ही दोघांनी चला.

सर्वांनी पक्क्या निर्धाराने एकमेकांना साथ देण्याचे वचन दिले. पुन्हा आपल्या घोडयावर स्वार होऊन ते निघाले पुढे विक्रमसेन त्याच्या मागोमाग आदित्यसेन व गौरवसेन चालू लागले.

पुढे कोणते संकट येणार यांची कोणालाच पुसटशीही कल्पना नव्हती. पुढे त्यांना दलदल दिसली त्याच्या शेजारुन जाणारा रस्ता जरा चांगला होता म्हणून त्यां रस्त्याने पुढे जाण्यासाठी विक्रमसेन पुढे होणार तितक्यात घोडयाच्या पायाने एक दगड पुढे सरकला तो चांगल्या रस्त्यावर जाऊन पडला तितक्यात चांगल्या रस्ताने त्या दगडाला गिळंकृत केले. विक्रमसेनने हाताच्या खुणेने सगळ्यांना थांबवलं त्यांने परत एक दगड घेतला व त्या रस्त्यावर टाकला



पुन्हा तो दगड जमिनिच्या आत गेला. विक्रमसेनने अजून एक दगड दलदलीच्या भागात टाकला तर तो दगड वरती जसानतसा राहीला. त्याच्या लक्षात आल की जे दिसतय तसे नाही. त्यांनी पूर्ण खराब दलदलीच्या रस्त्याने जायचं ठरवलं. पुढे गेल्यावर पुन्हा त्यांना दलदल दिसली व एक चांगला रस्ता दिसला त्यांनी पुन्हा दगड फेकून बघितले दोन्ही ठिकाणी दगड बुडले आत काय करायचे त्यांनी दलदलीत परत मोठे मोठे दगड टाकले. हया दगडातले काही दगड वरती आले व त्या दगडांचा पुल तयार झाला तिघे राजकुमार दगडांच्या पुलावरुन सुखरुप बाहेर पडले. हे पहिले जंगल जर त्यांनी सुखरुप पार पाडले होते.

आता दुसऱ्या जंगलात त्यांचा प्रवास सुरु झाला. रात्र फार झाली होती पण कुठे थांबुन वेळ वाया घालवण त्यांना शक्य ही नव्हत. गौरवसेनने विक्रमसेनला आपली शंका बोलून दाखवली की, आत्ताच आपण खुप भयानक



जंगलातून आलो आहोत. हया जंगला विषयी आपल्याला काही माहित नाही. अन रात्रीचा प्रवास आपल्याला धोकादायक ठरले. आपण रात्रीचा इथेच कुठेतरी मुक्कम करु. विक्रमसेनला त्याचे म्हणणे पटत होते. पण आकाशातील चंद्रकोर त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पौर्णिमेला फक्त पाच दिवसच बाकी आहेत. आत्ताशी आपण एकच जंगल पार केलं अजून चार जंगल, पाच डोंगर पार करुन समुद्रातील सफर हया सर्व गोष्टींमुळे त्यांची झोप तहान भूक

सगळी हरपून गेली होती. पण जंगला विषयी काहीच माहिती नसतांना सगळयांचा जीव धोक्यात घालणं त्यांना मान्य नव्हतं. त्याला समोरच एक बहारदार झाड दिसलं. त्या झाडाखाली आपण आराम करुया आणि पहाटे लवकर ऊठून पुढच्या प्रवासाला लागूया असं त्यांने दोन्ही भावांना सांगितले. विक्रमसेनच्या आदेशानुसार ते झाडाजवळ जाऊन बसले. तितक्यात झाडाच्या दोन्ही फांद्यांनी त्यांना उचचले आणि झाडाच्या ठोलीत त्यांना टाकून दिले. हे तिघे आणि त्यांचे घोडे खुप खोल अंधारात घरंगळत घरंगळत गेले आणि एका गुहेत जाऊन पडले.

गुहा एकदम मोठी लांबलचक होती. त्यांनी आपल्या घोडयांना हाताशी घेतले आणि ते पुढे पुढे चालत गेले. गुहा खुप अंधारी व भयानक होती त्यांनी आपल्या तलवारी हातात घेतल्या व ते पुढे पुढे जाऊ लागले. त्या गुहेत माणसांचे फिरते मुंडके होते. ते त्यांच्या वाटेत मधे मधे येत होते. पण त्यांनी राजकुमारांना काही केले नाही. पायाशी वळवळणारे मोठे मोठे साप त्यांच्या अंगाखाद्यांवरुन चढून उतरत होते. पण त्यांनी सुध्दा राजकुमारांना काहीच केले नाही. सतत चार तास चालल्यानंतर गुहा एका मोठया नदीपाशी संपली अजून एक जंगल त्यांनी पार केलं होत. त्यांना खुप आनंद झाला. आरंभ करण्याचा त्यांचा वेळ वाचला होता. आता रात्र संपण्याची त्यांना वाट बघावी लागणार नव्हती. सकाळ व्हायला थोडाच अवधी बाकी होता. एका मोठया दगडावर ते जराशे आडवे झाले होते. थकव्यामुळे



त्यांना आपोआपच झोप येत होती काही क्षणातच ते तिघे एका दगडावर गाढ झोपी गेले. त्यांचे घोडे त्यांच्या जवळच उभे होते. थोडयावेळाने त्यांना काही तरी हलल्यासारखे वाटले ते अचानक जागे झाले. उठून इकडे तिकडे बघायला लागले. बघतात तो काय ज्याला दगड समजून ते झोपलेले होते तो दगड नव्हताच तो एक पाण्यात चालणारा विचित्र प्राणी होता. त्याला दोन डोके होते. इतक्या मोठया आवाढव्य प्राण्याच्या आपण तावडीत सापडलो. याची त्यांना कल्पना होती. आता करायच काय त्यांनी आपले हत्यार बाहेर काढले. हया प्राण्यावर हल्ला करावा की नाही हयाच्या विचारात असतांनाच तो प्राणी माणसासारखा बोलू लागला. हं आता उतरा माझ्या पाठीवरुन किनारा आला. तुम्हाला कुठे जायचं आहे?

त्याच्या पाठीवरुन उतरत उतरतच आदित्यसेनने त्यांना आपण लाल समुद्रापाशी जात असल्याच सांगितलं.

त्या प्राण्याने त्यांना त्याचा एक एक दात दिला व सांगितले. लक्षात ठेवा समुद्रावर जाण्यासाठी दुसरा कोणताही रस्ता पकडा. परंतु डोंगर ओलांडतांना विशेष काळजी घ्या. डोंगराच्या जवळून जाण्याचा प्रयत्न करु नका. डोंगराच्या खुप उंचावरुन प्रवास करा. हे दात कधी तरी तुम्हाला कामास येतील. हे दात तुमच्या बुटात टाकल्यावर तुम्ही हवी तेव्हढी उंच उडी मारु शकतात. फक्त तिथे पोहचायचं ती जागा मनात धरा. आणि तुम्ही तिथे पोहोचाल.



त्या विचित्र प्राण्याचा निरोप घेऊन ते तिघे पुढच्या

प्रवासाला निघाले पुढच्या जंगलात त्यांनी प्रवास केला. जंगल खुप सुंदर होते हया जंगलात प्रत्येक झाड, प्रत्येकफळ, प्रत्येक पान प्रत्येक दगड, माती एकमेकांशी हसून बोलत होते. एकमेकांची चेष्टा करत होत. जंगलात हे कोण नविन पाहुणे आले? हयांना आधीतर कधीच बघितले नाही. हयांचे नांव काय? हे इथे कोणाला भेटायला आले? हे तिघे जण कोणाशीच काही बोलत नव्हते. उगाचच बोलून आपल्याला अडचण निर्माण झाली तर ते घोडयावर बसुन आपले सरळ सरळ जात होते. तितक्यात समोर आलेल्या दोन झाडांनी आपल्या फांद्यांनी त्यांचा रस्ता अडवला, ''आम्ही तुमच्याशी बोलतोय, समजत नाही का तुम्हाला, आमच्या एकाही प्रश्नाचं उत्तर न देता तुम्ही पुढे कसे जातायेत. आता तुम्हाला आमच्या राजाकडे नेले पाहिजे. आमच्या राजापाशी तुमची तक्रार करतो. तिघांनी काही बोलाच्या आत सात आठ झाडे चालत त्यांच्या जवळ आली त्यांनी गोलाकार करुन त्यांना वेढल त्यांच्या फांद्या एकमेकांत गुंफल्या तिन्ही राजपुत्रांनी आपली सुटका करण्याचा खुप प्रयत्न केला. पण सर्व व्यर्थ झाले. ते आपली सुटका करु शकले नाही. झाडांनी त्यांना एक काळया गुहेपाशी आणले. व आपल्या राजाला हाक मारण्यास सुरवात केली. ''बादशहा बादशहा''



त्या जंगलाचा बादशहा मोठमोठयाने आवाज करतच बाहेर आला. तो एक अक्राळ विक्राळ राक्षस होता. त्या बादशहाने

आपल्या हातात तिघांना व दुसऱ्या हातात तिन घोडयांना पकडले आणि तो गुहेच्या आत गेला. एका छोटया पिंजऱ्यात त्यांना टाकून दिले. तो स्वत: परत गुहेच्या बाहेर गेला व मोठा दगड ठेऊन त्याने गुहेचे दार बंद केले. राक्षस दोन दिवस गुहेत परत आलाच नाही. राजकुमारांकडे आधीच दिवस कमी होते. त्यात दोन दिवस इथे या पिंजऱ्यात अडकून वाया गेले.

पिंजऱ्यात अडकल्यावर आदित्यसेनचा तर धिरच संपला. तो आपल्या लाडक्या बहिनीच्या आठवणीने खूप रडू लागला. तितक्यात तिथे आतल्या खोलीतून तिन मुली आल्या त्या अतिशय सुंदर होत्या. त्या राक्षसाच्या मुली होत्या. राक्षसाच्या मुली खुप लाघवी व प्रेमळ होत्या मोठया मुलीचे नांव वैदेही, मधल्या मुलीचे नांव तन्मई व तिसऱ्या मुलीचे नांव गायत्री होते. पण त्या राक्षसाकडे बघून विश्वासच वाटत नव्हता की हया मुली त्या अक्राळ विक्राळ कुरुप राक्षसाच्या मुली आहेत. त्या मुलींनी राजकुमारांना थोडा दिलासा दिला व त्यांनी राजकुमारांची सुटका करण्याचे त्यांना वचन दिले.

गौरवसेनने त्या मुलींना विचारले की, हे खरोखर तुमचे वडील आहे की त्यांनी तुम्हाला कुठून उचलून आणले?

या प्रश्नावर मोठी मुलगी सारी हकीकत सांगू लागली.......

राक्षसाचे नांव शुरसेन ते खरच आमचे वडील आहेत. ते हया जंगलाचे राजा आहेत त्यांचे आमची आई प्रियंवदावर खूप प्रेम आहे. इतक प्रेम जगात कोणी कोणावर करु शकत नाही. ते एकमेकांना इतक प्रेम करत की एकमेकांशिवाय ते राहूच शकत नव्हते. अशात एके दिवशी आईच्या पायात विषारी काटे घुसले आणि ती वेदनेने तडफडू लागली. तिच्या वेदनेने वडील

इतके तळमळले ते खुप चिडले खुप संतापले त्यामुळे त्यांना हे अक्राळ विक्राळ रुप मिळाले.

तुझी आई कुठे आहे. विक्रमसेनने विचारले. गायत्रीने पिंजऱ्याचा दरवाजा उघडला हे सगळे पिंजऱ्यातून बाहेर आले. मग तिघे जण त्या तिन मुलींबरोबर एका छोटया बोळीतून लहान खोलीच्या दिशेने निघाले. दालनाच्या बाहेरच गायत्रीने त्यांना थांबवले आणि तिघांनी तलवारी हातात घेतल्या आणि त्या तिघांना आपआपल्या तलवारी काढण्यास सांगितल्या. तन्मईने सांगितले की, आईच्या जखमेतुन खुप मोठे मोठे किडे निघतात ते सगळे वळवळत आपल्या अंगावर चढतात. मधेच आदित्यसेन खुप चिडला आपण इथे कशाला येतोय आपल्याला आपल्या बहिणीचा प्राण वाचवायचा आहे ना. उगाच कशाला आपण वेळ वाया घालवतोय.

बहिणीचा प्राण वाचवायचा ? म्हणजे तुमच्या बहिनीला काय झालं आहे. गायत्रिने उत्सुकतेने विचारल.

गौरवसेनने आदित्यला जवळ घेऊन शांत केले व बहिनीच्या बाबतीत काय झाले हे सगळ सांगितले.

वैदेही ने तिघांच्या वतीने विक्रमसेनला वचन दिल कि आम्ही तुमची मदत करु तुम्ही निश्चिंत रहा.

मग तिघे त्या दालनामध्ये जाण्यास तयार झाले. दरवाजा उघडताच मोठे मोठे किडे दरवाजातून बाहेर यायला बघत होते. सगळयांनी आपल्या तलवारींनी त्या सर्व किडयांवर वार केले. आणि किडयांचा खातमा केला. तिथे जवळ प्रियंवदा वेदनेने विव्हळत बसली होती. तिला बघून राजकुमारांना

तिची फार दया आली. विक्रमसेनने आपल्या कंबरेला बांधलेल्या पिशवितून जादुगरनीने दिलेली औषधाची बाटली काढली

किडयांच्या मारण्याच्या आवाजाने राक्षस गुहेत परत आला. तो खुप आरडा ओरडा करत होता. त्याला पिंजरा रिकामा दिसला तो खुप संतापला होता. गुहेतल्या सर्व वस्तु तो इकडे तिकडे फेकायला लागला.

राक्षसाचा आवाज आल्या बरोबर विक्रमसेनने आपले काम भराभर उरकायला घेतलं. त्यांने पटकन त्या मुलींच्या आईच्या जखमेवर ते औषध ओतलं. औषधाच्या एका थेंबाने फार मोठी जादू झाली ती बाई प्रियंवदा एकदम बरी झाली. आणि ती पहिल्या सारखीच सुंदर दिसायला लागली. समोर आपल्या मुलींना बघुन तिला खुप आनंद झाला. मुलींना जवळ घेऊन ती खुप रडली.

राक्षस इकडे आरडा ओरडाच करत होता. छोटया खोलीत जाण्याचा रस्ता एकदम बोळीचा होता. त्यामुळे तो तिथे जाऊ शकत नव्हता. तो बाहेरुनच खुप ओरडत होता.

मुलींनी आईला सांगितले की, ''आई तुझी अशी अवस्था बाबांना सहन नाही झाली.

प्रियंवदाला हे सहन झाले नाही ती रुमच्य बाहेर आली. समोर उभा असलेला अक्राळ विक्राळ मनुष्य म्हणजे आपल्यावर जीवापाड प्रेम करणारा आपला नवरा आहे हे तीला समजलं होतं तिने पळत जाऊनच त्या राक्षसाला मिठी मारली.

आपली लाडकी प्रियंवदा पुन्हा तिच्या रुपात परत आलेली बघून राक्षसाला खूप आनंद झाला. तो खुप खुष झाला. त्या च्या खुष होण्याने तो पुन्हा पुर्वववत झाला.

आपले आई बाबा पुन्हा निट झाले याचा तिघी मुलींना फार आनंद झाला. तितक्यात शुरसेनचे त्या तिन मुलांकडे लक्ष गेले. प्रियंवदाने सांगितले की हया मुलांमुळेच मी निट झाले आहे.

वैदेहीने पण तिच्या बाबांना सांगितले की, हयांची बहिण मरणाच्या दारात आहे. आता आपण हयांना मदत केलीच पाहिजे. त्यांना लाल समुद्रापाशी सोन्याच्या कमळापाशी जायच आहे.



प्रथम बादशहा शुरसेनने त्यांचे आभार मानले नंतर ता आपल्या बागेत गेला. आणि त्यांनी टोपलीभर डायमंड फ्लॉवर तोडून आणले. त्यांचमकदार फुंलच्या त्यांनी तिन माळा केल्या. व त्या तिन माळा तिन्ही घोडयांच्या गळयात घातल्या तितक्यात त्या घोडयांना पंख फुटले. आता ते लाल समुद्रापर्यंत लगेच पोहोचणार होते.

प्रियंवदाने सुध्दा त्या तिघांना एक एक सोन्याचे ब्रेसलेट दिलं. ते ब्रेसलेट घालून ते गायब होणार होते. आणि कोणालाच दिसणार नव्हते.

बादशहा शुरसेन व त्याची पत्नी प्रियंवदा आणि मुली वैदेही, तन्मई, गायत्री यांचा निरोप घेऊन तिघे राजकुमार घोडयाव स्वार झाले आणि लाल

समुद्राच्य दिशेने निघाले. आता त्यांचा घोडा उडत होता. उरलेले दोन जंगल व पाच डोंगर त्यांनी वरुनच बघीतले अतिशय भयानक आग ओकणारे डोंगर होते ते.

राक्षसाची झालेली भेट त्यांना एका अर्थी फायद्याचीच ठरली होती.

थोडया वेळातच त्यांनी खालती लाल समुद्र दिसला आता राज होत होती आपले घोडे किनाऱ्याला एका सुरक्षित जागी ठेवून ते समुद्राच्या दिशेने जाऊ लागले. आता तोंडात घालण्याच्या गोळीचा वापर करुन समुद्रात प्रवेश करावा असा त्यांनी विचार केला. अन गोळी तोंडात टाकली. तितक्यात आकाशात चंद्र वरती येऊ लागला. आज पौर्णिमा आहे हे चंद्राकडे बघून त्यांना कळाले. समुद्राकडे त्यांनी नजर टाकली बघतात तो काय चंद्राचा प्रकाश जसजसा समुद्राच्या पाण्यावर पडत होता तसतसा समुद्रात आत जायला रस्ता तयार होत होता. त्या रस्त्याने ते आत गेले. आत एवढया मोठया विशाल समुद्रात सोनेरी कमळ शोधायचे कुठे.

ते समुद्रात खुप लांबवर एक फेरफटका मारुन आले. अचानक त्यांना कोणीतरी मोठया जाळयात अडकविले. समोर दोन मोठे समुद्री प्राणी होते. विशाल देह कपाळावर एक शिंग चेहऱ्याला एक डोळा अंगाला बारा ते पंधरा पाय मोठी काटेरी शेपूट अशा त्या प्राण्यांनी त्यांना जाळयात पकडले होते. त्या प्राण्यांनी तिघा राजकुमारांना पकडून एका मोठया महालात नेले. महालात एक जलपरी होती. ती समुद्राची राणी होती. विना कारण समुद्रात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाला ती शिक्षा देत होती.

त्या विशाल प्राण्यांनी राणी समोर तिघा राजकुमारांना मोकळे केले तिघांकडे जलपरीने निट बघितले. तिला हया तिघांची फार दया आली. तिने हया समुद्रात येण्याचे कारण विचारले. राजकुमार विक्रमसेनने सोन्याच्या कमळाविषयी सांगितले. आणि आपल्या बहिणीविषयी सांगितले.

जलपरीने त्यांना मदत करायच ठरवलं. तिने सांगितले की, ते सोन्याचे कमळ समुद्राच्या दुसऱ्या टोकाला आहे. त्या टोकाला युडोस राजाचे राज्य आहे. युडोस राजा खुप ताकदवान आहे. व खुप दुष्ट आहे. त्याने समुद्रातील सर्व माश्यांना पुतळे बनविले आहे. व आपला महाल सजवला त्या दुष्टाचा प्राण त्या कमळात आहे. त्या आलिशान महालात एक कारंजा आहे. त्या कमळाच्या फुलात एक हिरा आहे. तो हिरा गोल फिरवला की त्या फुलाच्या पाकळया वेगळया होतील व देठ मोकळा होईल. त्या पाकळया मोकळया झाल्या शिवाय तो दुष्ट मरणार नाही. त्या देठात तो मधुकलश आहे. हिरा गोल फिरवल्या शिवाय मधुकलश काढता येणार नाही. परंतु त्या हिऱ्यावर एक विषारी भुंगा बसलेला आहे. हया भुंग्याला कमळावरुन उठवणे सहज शक्य नाही. त्यासमोर दुसरे फुल ठेवले तरच तो त्या फुलावरुन उठेन. तुमच काम झाल्यावर तो हिरा सर्व महालात फिरवा म्हणजे सर्व पुतळे झालेले मासे पुन्हा आपल्या रुपात येतील.

जलपरीने तिच्या शार्क माशाला हया तिघा राजकुमारांना समुद्राच्या त्या टोकाला युडोस राज्याच्या हद्दीपर्यंत सोडण्यास सांगितले.

परीचा आशिर्वाद घेऊन ते तिघे निघाले. शार्कमाशाच्या पाठीवर ते घट्ट बसले शार्कने सुध्दा खुप लवकर त्यांना समुद्राच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे युडोसच्या हद्दीपर्यंत सोडले अन शार्क तिथून पटकन निघून गेला.

थोडया अंतरावर त्यांना महाल दिसला आता वेळ आली होती गुप्त होण्याची. म्हणून राणी प्रियंवदाने दिलेले ब्रेसलेट त्यांनी घातले व एकमेकांचा हात पकडून ते चालू लागले. फक्त पाण्याच्या हलचाली वरुन तिथून कोणीतरी जातयं हे कळु शकत होतं. पण त्याला काही पर्याय नव्हता.

आता हळू हळू महालात शिरले. महालाच्या दाराशी दोन धिप्पाड राक्षस पहारा देत बसले होते. पण त्यांना काहीच समजल नांही. ते पुढे पुढे चालू लागले. पुढे त्यांना एक कारंजा दिसला, हाच तो कारंजा हे त्यांना समजल. ते कारंजाच्या दिशेने जायला निघाले. अचानक त्यांच्या पायांना सगळी कडून कोणीतरी घट्ट पकडल्या सारखे झाले. झपाटयाने वाढणारी जंगली वेल त्यांच्या पायाभोवती वेटोळे घेत होती. ते एकमेकांशी बोलत होते पण एकमेकांना दिसत नव्हते. इतक्यात विक्रम सेनने आपल्या कंबरेची पिशवी काढली आणि त्या बॅगेतून जादुगरणी चित्रांगणाने दिलेली विषारी औषध खाली टाकले. ते औषध क्षणात सगळीकडे पसरले आणि ती वनस्पती नष्ट झाली. वनस्पती नष्ट झाल्याबरोबर पण्याचा लाल रंग बदलला आणि पाणी पांढरे स्वच्छ झाले. पाणी पांढरे स्वच्छ झाल्याबरोबर युडोस राजाला कळलं की आपल्या महालात कोणीतरी आलंय. तो पळत पळत आपल्या सोन्याच्या कमळापाशी आला. पण त्याला कोणीच दिसले नाही. पाण्याच्या हलचाली वरुन त्याच्या लगेच लक्षात आलं की कोणीतरी गुप्त अवस्थेत आहे. त्यांने हातातल्या छडीने जागोजागी जादुचे आरसे ऊभे केले. त्या आरशाच्या समोर

आल्याने गुप्त व्यक्ती लगेच दिसू लागते. क्षणातच युडोस राजाला तिन्ही राजकुमार दिसू लागले.

युडोस राजाने आपली तलवार काढली. विक्रमसेन चे अन युडोसचे युध्द चालू झाले विक्रमसेनने दोन्ही भावांना फुलाकडे जाण्याचा इशारा केला.

आता विक्रमसेन जादुगरणी चित्रांगणाने दिलेल्या हत्याराचाच वापर करत होता. कारण युडोस मध्येच काहितरी जादू करत होता. त्याची जादू हाणून पाडण्यासाठी त्याला हयाच हत्याराचा वापर करावा लागत होता.

इकडे गौरवसेन व आदित्यसेन फुलापर्यंत पोहचले. त्यांनी फुलावर भुंगा बघीतला, जलपरीने सांगितलेलं त्याला आठवलं, भुंग्याजवळ दुसरं फुल ठेवलं तरच तो त्या फुलावरुन उठेलं. गौरवसेनने त्याच्या पिशवितून एक सुंदर फुल काढले हे फुल बादशहा शुरसेनच्याच बागेतले होते. त्याने ते फुल भुंग्याजवळ नेले. भुंगा लगेच त्या कमळावरुन उठला आणि नव्या फुलावर जाऊन बसला. अदित्यसेनने तो हिरा फिरवला फुलाच्या पाकळया मोकळया झाल्या त्या क्षणी युडोस राजा खाली कोसळला व मरण पावला.

तिघा राजकुमारांनी तो हिरा घेतला आदित्यसेनने कमळाच्या देठातून मधु कलश बाहेर काढला अन आपल्या कमरेच्या पिशवीत ठेवला. तिघांना खुप आनंद झाला.



सकाळ झाली होती. त्यांना लवकर परतीच्या प्रवासाला निघायच होतं. त्यांनी तो हिरा सर्व महालात फिरवला. हिऱ्याच्या चमकेने सर्व मासे जीवंत झाले व पाण्यात पोहायला निघाले. युडोसचा महाल

सुध्दा पूर्ण सोन्याचा झाला.  आता त्यांना निघायच होत तितक्यात जलपरी त्यांचे आभार मानायला तिथे आली. विक्रमसेनने तो हिरा जलपरीला देऊन टाकला.  आता सर्व समुद्राची जलपरीच राणी झाली होती.  जलपरीने त्यांना एक एक मोत्याची माळ दिली व सांगितले की ही माळ सर्व संकटातून तुमचे रक्षण करेन.  माळ कधीच गळयातून काढू नका.

जलपरीचा निरोप घेऊन ते निघाले त्यांनी आपल्या बॅग मधून दुसऱ्या जंगलाच्या शेवटी भेटलेल्या विचित्र प्राण्याचा दात बुटात टाकला.  एकमेकांचे हात पकडले आणि एकदम समुद्र किनाऱ्यावर उडी घेतली.

किनाऱ्यावर त्यांचे घोडे उभे होते ते घोडयावर बसले व आपल्या नगरात जाण्यास निघाले.  घोडे उडू लागले. एका मागून एक अंतर पार होत राहीलं, पाच डोंगर मागे गेले, मग दोन जंगल मागे गेले. शुरसेनचे हसरं जंगल लागलं. सर्वांनी खाली बघीतलं, वैदेही, तन्मई गायत्री त्यांना टाटा करत होत्या. ते खुप पुढे गेले तरी मागे वळून तिघांना टाटा करत होती. तिघांनी एकमेकांकडे बघितले. तिघांचे हसणे मजा करणे चालू झाले. विक्रमसेनने गौरवसेनला विचारले तु बादशहाच्या जंगलातून फुल कधी रे तोडलंस. गौरव खुप लाजला त्याला ते फुल तन्मईने दिले असे त्यांने सांगितले त्यांचे भावंड लगेच त्यांची खोडी काढू लागले. त्याला चिडवू लागले. मग गौरवसेन पुढे जाऊ लागला अन दोघे त्यांच्या मागे मागे लागले. अजुन तिन जंगल पार झाले.  घोडा त्यांच्या नगरात योऊन पोहचला त्यांनी त्यांच्या नगरात प्रवेश केल्या बरोबर सगळे आनंदाने नाचू लागले. नगरात सगळीकडे राजकुमारांचा जयजयकार होत होता. मग घोडा त्यांच्या महालात पोहोचला.

तिघे राजकुमार सुखरुप परत आल्यामुळे राजा राणीला खुप आनंद झाला. राणी कल्याणीने लगेच एक मधाचा थेंब आदितीच्या तोंडात टाकला.

आदिती उठून बसली सगळयांना खुप खुप आनंद झाला.

महालात जादुगरणी चित्रांगणा अन तिची बहीण निशीगंधा आल्या आणि त्यांचा अचानक परीच्या रुपात बदल झाला. निशिगंधाने राजाला सांगितले की, मी मुद्दाम हे कृत्य केलं होतं कारण फक्त तुमचे राजकुमारच हे काम करु शकणार होते. तुमच्या राजकुमारांमुळेच बऱ्याच जणांना नविन जीवन मिळाले. सर्वांना आशिर्वाद देऊन त्या तिथुन निघुन गेल्या.

राजाने राज्यात मोठा उत्सव साजरा करायचे ठरवले. सर्व नगरभर याची वार्ता पसरली. बादशहा शुरसेनला त्यांची पत्नी प्रियंवदा व त्याच्या तिन्ही कन्येंसह उत्सवात सामिल होण्यास आमंत्रित करण्यात आले. सर्व गोष्टी राज्याच्या मनाप्रमाणे घडत होत्या.

राजाने वनराज शुरसेनच्या मुलींचा आपल्या मुलांबरोबर विवाह लावुन दिला. राजकुमार खुप खुष होते. सगळे खुष झाले. राजकन्या आदितीला नविन तीन मैत्रिणी मिळाल्या.

सर्व काही सर्वांच्या मनाप्रमाणे घडले. सारी नगरी आनंदली.

– सौ.अनघा हिरे

9422284116

## ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले मित्र

टीम ई साहित्य